महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील महिला व युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरीता कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणेबाबत.

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील (मुस्लिम, ख्रिश्चन,शीख, बौध्द, पारशी, जैन व ज्यू) होतकरू व गरजू महिला व युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हाव्यात याकरीता कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणेकरीता कौशल्य विषयक प्रशिक्षण कार्यक्रम सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राबवण्याकरीता शासन निर्णय दिनांक २६ ऑगस्ट २०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम संपूर्ण राज्यातील जिल्हयामध्ये राबविण्यात येणार आहे. याकरीता इच्छूक व पात्र प्रशिक्षण संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**प्रशिक्षण संस्थेची पात्रता, अटी व शर्ती:-**

१) प्रशिक्षण संस्था नोंदणीकृत असावी,

२) प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे सूचिबध्द (नोंदणीकृत) असणे आवश्यक आहे.

३) केंद्रशासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक प्रशिक्षण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या आणि सदर योजना राबविणाऱ्या राज्यातील प्रशिक्षण संस्था देखील उक्त योजनेकरीता पात्र ठरतील.

४) कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी संबंधित संस्थेकडे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या विहीत नियमानुसार आवश्यक पायाभूत सुविधा/पुरेसे मनुष्यबळ यांची सक्षमता असणे आवश्यक राहील.

५) कौशल्यविषयक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याकरीता निवड करण्यात येणा-या प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विकास संस्थांना किंवा अल्पसंख्याक समुहातील लोकांसाठी प्रशिक्षण देण्याचा अनुभव असलेल्या प्रशिक्षण संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

६) प्रशिक्षण संस्थेने NSFQ (National Skill Qualification Framework ) शी सुसंगत आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या एकात्मिक वेबपोर्टलवर उपलब्ध असलेले कौशल्यविषयक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक राहील.

७) प्रशिक्षण संस्थेस राज्य किंवा केंद्र शासनाच्या काळ्या यादीत टाकलेले नसावे.

८) प्रशिक्षण संस्था ही किमान तीन वर्षे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याच्या क्षेत्रात काम करणारी असावी.

९) प्रशिक्षण संस्थेकडे पुरेशी जागा,स्वतःचा प्रशिक्षित प्रशिक्षक वर्ग तसेच प्रशिक्षणाकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध असणे आवश्यक राहील.

१०) सदर योजनेकरीता लाभार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद घेण्याकरीता प्रशिक्षण संस्थेकडे बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीची सोय असणे आवश्यक राहील.

११) मागील तीन वर्षात प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थी उमेदवारांना रोजगार /स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिलेल्या प्रशिक्षण संस्थांची प्राथम्याने निवड करण्यात येईल.

ज्या संस्था वरील अटी व शर्तींची पूर्तता करतात अशा प्रशिक्षण संस्थांनी सोबतच्या प्रपत्र अ,ब,क च्या विहित नमुन्यामध्ये अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, खोली क्र.७१४, ७ वा मजला (विस्तार), हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-३२ या पत्त्यावर विहित नमुन्यात संपूर्ण तपशीलासह त्यांचे अर्ज दि. **५ सप्टेंबर , २०१९** रोजी पर्यंत सादर करावेत.

संपर्क:- desk9.mdd-mh@gov.in

दि. २८ ऑगस्ट , २०१९

ठिकाण- मुंबई

उप सचिव,

अल्पसंख्याक विकास विभाग

महाराष्ट्र शासन

प्रशिक्षण संस्थेने खालील माहिती सादर करणे बंधनकारक

प्रपत्र अ

| अ.क्र. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| | प्रशिक्षण संस्थेचे नाव | |
| | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| | संपर्क व्यक्तीचे नाव<br>पदनाम<br>दूरध्वनी क्र./ मोबाईल क्र.ई मेल<br>वेबसाईट | |
| | प्रशिक्षण केंद्राचा संपूर्ण पत्ता<br>संपर्क व्यक्तीचे नाव<br>पदनाम<br>दूरध्वनी क्र./ मोबाईल क्र.<br>ई मेल आयडी | |
| | संस्था कौशल्य प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे सूचीबध्द (नोंदणीकृत) आहे किंवा कसे,<br>असल्यास, नोंदणी क्रमांक व तारीख | |
| | संस्थेने केंद्रशासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण दिले आहे किंवा कसे | |
| | संस्था कोणकोणत्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहे? त्या कौशल्य प्रशिक्षण क्षेत्रांची नावे आणि ज्या क्षेत्रात/ जिल्हयात प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहेत त्यांची नावे. | |

प्रपत्र ब

संस्थेतील प्रशिक्षकांची माहिती

| अ.क्र. | प्रशिक्षकांची नावे | शैक्षणिक पात्रता | एकूण वर्षाचा अनुभव |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

प्रपत्र क

प्रशिक्षण **संस्थेचा अनुभव**--- खालील तक्त्यात प्रशिक्षण संस्थेचा प्रशिक्षण विषयक मागील ३ वर्षाचा अनुभव दस्ताऐवजासह सादर करणे आवश्यक.

जिल्ह्याचे नाव--

आर्थिक वर्ष--

| ७ | विभागाचे नाव | विभागा अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | योजनेचे नाव | क्षेत्र (सेक्टर) | अभ्यासक्रमाचे नाव | प्रशिक्षण संदर्भातील माहिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रशिक्षण लक्ष्य | प्रशिक्षण साध्य | प्रशिक्षित उमेदवार | | तरतूद निधी (रु. लाखात) | खर्च (रु. लाखात |
| | | | | | | | | रोजगार प्राप्त उमेदवार संख्या | स्वयंरोजगार प्राप्त उमेदवार संख्या | | |
| | | | | | | | | | | | |